**नियमित दिवाणी दावा क्र.१५१/२०१३ मधील**

**अर्ज निशाणी क्र.६३ खालील आदेश**

**(CNR No. MHWS050000112009)**

१. प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे नियमित दिवाणी दावा क्र. ६४/१९८३ मधील दावा निशाणी क्र.१, दिनांक ११.९.२००० रोजीचा न्यायनिर्ण व हुकूमनामा, नकाशा, पत्र इत्यादी आठ कागदपत्रांच्या सत्यप्रती दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास प्रतिवादी क्र.१–अ ते १–क यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. इतर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दिलेले नाही. वादींतर्फे विधीज्ञ श्री. राजेश प्रधान आणि प्रतिवादी क्र.१–अ ते १–क यांच्यातर्फे विधिज्ञ श्री. पी.आर. बंग यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी दाखल करु इच्छित असलेल्या नियमित दिवाणी दावा क्र. ६४/१९८३ मधील दावा निशाणी क्र.१, दिनांक ११.९.२००० रोजीचा न्यायनिर्ण व हुकूमनामा, नकाशा, पत्र इत्यादी आठ कागदपत्रांच्या सत्यप्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | ..अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :–**

३. वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या दाव्यात वादींतर्फे साक्षीदार क्र. १ म्हणून बबन ग्यानुजी गवई यांचे पुराव्यावचे शपथपत्र निशाणी क्र. ६१ अन्वये दाखल केलेले आहे. तसेच वादी हे नियमित दिवाणी दावा क्र. ६४/१९८३ मधील दावा निशाणी क्र.१, दिनांक ११.९.२००० रोजीचा न्यायनिर्ण व हुकूमनामा, नकाशा, पत्र इत्यादी आठ कागदपत्रांच्या सत्यप्रती दाखल करु इच्छीत आहेत. त्यामुळे त्या सत्यप्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट प्रतिवादी क्र.१–अ ते १–क यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादींनी ती कागदपत्रे खूप उशीराने दाखल केलेली आहेत. त्यामुळे ते दस्त दाखल करण्यासाठी प्रतिवादींची हरकत आहे. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, या दाव्यात तत्तकालीन न्यायिक अधिकारी यांनी निशाणी क्र. १५ अन्वये मुद्दे काढलेले आहेत. त्यानंतर वादी क्र. १ यांनी निशाणी क्र. ६१ अन्वये त्यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे आणि प्रस्तुतचा दावा वादीचा पुढील सरतपास व उलटतपास नोंदविणेसाठी प्रलंबीत आहे. वादींनी प्रस्तुतच्या दाव्यात नियमित दिवाणी दावा क्र. ६४/१९८३ मधील दिनांक ११.९.२००० रोजीच्या न्यायनिर्णयाच्या व हुकूमनाम्याच्या विरुध्द दाखल केलेला आहे. त्यामुळे त्या उपरोक्त सत्यप्रतीच्या अनुषंगाने प्रतिवादींना वादीचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. या परिस्थीतीत संबंधीत सत्यप्रती अभिलेखावर आल्या तर प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली काढण्यास ते दस्त उपयुक्त ठरु शकतात. त्यामुळे त्या सत्यप्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि वादी यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.६३ मंजुर करण्यात येत आहे आणि वादींना त्या सत्यप्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.01.16 17:05:59 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : १६.१.२०२६

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :-Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 16.1.2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 16.1.2026 |
| 5) | Order uploaded on | :- 16.1.2026 |